
ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष १९ | पुणे, बुधवार, ५ सप्टेंबर, १९७३ | अंक १७




माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

## आईजीच्या जिवावर बाईजी उदार !

### स्टेट बँकेच्या चेअरमनचे बँकेच्या खर्चाने अध्यात्म

स्टेट बँक ऑफ इंडियाचे चेअरमन बँकेच्या कामाच्या आवरणाखाली पाँडिचरीच्या अरविंद आश्रमाच्या वाऱ्या वरचेवर करीत असत, त्याबद्दल त्यांना मी स्वतः खुलासा विचारीन असे आश्वासन अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांना लोकसभेस देणे भाग पडले.

स्टेट बँकेने तिच्या चेअरमनच्या अध्यात्मिक वाऱ्यांचा खर्च का सोसावा, ह्या प्रश्नाला अर्थमंत्र्यांनी दिलेली उत्तरे सभासदांना पटली नाहीत. १ ऑगस्ट, १९७० पासून आतापर्यंत चेअरमननी पाँडिचरीच्या आश्रमाकडे अशा रीतीने २४ वाऱ्या केल्या ! मद्रासला दौऱ्यावर जावयाचे आणि तेथून पाँडिचरीची वारी करावयाची, अशी त्यांची पद्धत होती. श्री. चव्हाण म्हणाले, " आश्रमासाठी फंड गोळा करण्यासाठी ह्या वाऱ्या केल्या जात असत, हा आरोप खोटा आहे. चेअरमननी फंड गोळा करण्यासाठी बँकेच्या नोकरवर्गाचा उपयोग केला असल्याचे मला माहीत नाही, परंतु आश्रमाच्या फंडाची काही विनंतिपत्रके चेअरमनकडे वाटण्यासाठी आलेली होती, कारण ते अरविंदांचे आणि माताजींचे भक्त होते. स्टेट बँकेच्या मुंबई येथील नव्या इमारतीच्या इंटीरिअर डेकोरेशनच्या आर्किटेक्ट्सच्या फर्मशी अरविंद आश्रमात राहणाऱ्या एकाचा संबंध होता, हे खरे आहे. नव्या इमारतीमधील फर्निचरवर ३१·३६ लक्ष रु. खर्च झाले, त्यापैकी २·१५ लक्ष रु. चे काम पाँडिचरीच्या आश्रमातील लोकांना देण्यात आले होते. त्यांचे टेंडर सर्वांत कमी रकमेचे होते. ' स्टेट बँकेच्या दिल्ली शाखेतील ६० लक्ष रुपये अनधिकारे काढण्याच्या नगरवाला प्रकरणाची इत्थंभूत माहिती चेअरमनला होती म्हणून त्यांच्या गैरवर्तनाकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे ' हे श्री. मधु दंडवते ह्यांचे म्हणणे कपोलकल्पित आहे. चेअरमन मद्रासला गेले असताना तेथील ग्रामीण शाखांच्या कारभाराची चौकशी करण्याकडे त्यांनी वेळेचा उपयोग करू नये, असे म्हणता येणार नाही. त्यांच्या कृत्याचे मी समर्थन करू इच्छीत नाही. बँकेच्या कामात त्यांनी इतर गोष्टी मिसळावयास नको होत्या. "


---

**आगगाडीतील दिवे ११० व्होल्टचे करा**—सध्या आगगाडीतले विजेचे दिवे २४ व्होल्टचे आहेत, ते ११० व्होल्टचे करावेत म्हणजे आगीच्या अपघाताचा धोका कमी होईल, असे कमिशनर ऑफ रेल्वे सेफ्टी श्री. सी. आर. सुळे ह्यांनी एका अपघात चौकशीच्या अहवालात सुचविले आहे.

**साखरेच्या उत्पादनात वाढ**--ऑक्टोबर, १९७३ अखेर संपणाऱ्या ' साखर वर्षा 'मध्ये साखरेचे उत्पादन ३९ लक्ष टनांवर जाईल अशी अपेक्षा आहे. १९७३–७४ च्या मोसमात ते ४५ लक्ष टन होईल, असा अंदाज आहे.

या कामी बँक ऑफ महाराष्ट्र तुम्हाला जरूर साहाय्य करू शकते. छोटया माणसाच्या साहाय्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्राच्या अनेकविध योजना आहेत. उच्च शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य ही त्यापैकीच एक योजना आहे. साहाय्य वेळेवर मिळणारे आहे आणि त्याच्या शर्ती सोप्या आहेत. मग त्याचा लाभ का न घ्यावा?

उच्च शिक्षणासाठी पैसा हवाच !



बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस: ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

☆ अर्थ ☆

बुधवार, ५ सप्टेंबर, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## शेतीच्या संशोधनाची तातडीची गरज

ब्राझिल देशातील स्पॅन पालो ह्या ठिकाणी शेतीविषयक अर्थशास्त्रज्ञांची १५ वी आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यात आली होती. परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून भाषण करताना जागतिक बँकेचे कार्यकारी संचालक डॉ. एस. आर. सेन ह्यांनी शेती आणि लोकसंख्या नियंत्रण ह्या दोन क्षेत्रांत प्रचंड प्रमाणावर संशोधन करण्याची आणि त्यांचा विकास घडवून आणण्याची तातडीची जरूरी आहे असे सांगितले. ते म्हणाले की गव्हाच्या दर एकरी पिकात आश्चर्यकारक वाढ घडवून आणण्यात यश आलेले आहे. अशीच वाढ इतर बऱ्याच पिकांच्या बाबतीतही साधता येणे शक्य आहे. पण जगातील बहुसंख्य लोक, विशेषतः विकसनशील देशांतील लोक, ह्या बाबतीत स्वतः काही पावले टाकण्याच्या बाबतीत उदासीन दिसून येतात. ही परिस्थिती आहे तोपर्यंत जगातील शेतीचे व अर्थव्यवस्थेचे दीर्घकालीन भवितव्य फारसे आशादायक आहे असे म्हणता येणार नाही. दरम्यान विकसित व श्रीमंत देश जगात ज्या वस्तू व साधने दुर्मिळ आहेत आणि ज्या एकदा वापरल्या की पुन्हा मिळत नाहीत अशा वस्तूंचा व साधनांचा स्वतःसाठी बेसुमार वापर करीत राहतील. त्यामुळे जगाच्या भौतिक परिस्थितीतील समतोल बिघडून जाईल आणि प्रदूषणामुळे उद्भवणाऱ्या धोक्यांचे प्रमाण वाढेल. उलट, जे देश अविकसित आणि गरीब आहेत त्यांना मात्र पुन्हा निर्माण होऊ शकणाऱ्या व न होऊ शकणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या संपत्ती-साधनांच्या तुटवड्याला तोंड द्यावे लागेल. ह्या टंचाईत अन्न-पदार्थांचा समावेश असेलच. कारण, अन्नाची त्यांची गरज सतत वाढत जाणारी आहे.

## शत्रूची सांकेतिक लिपी : रहस्य फोडण्याचे महत्त्व

युद्धमान देश युद्ध चालविताना आपआपल्या सांकेतिक लिपीचा वापर करीत असतात. दळणवळणाची साधने जुनी होती तेव्हा शत्रुपक्षाच्या एखाद्या जासुदाला पकडून बातम्या मिळविण्यात येत. पण आताच्या शास्त्रीय युगात एकमेकांचे बिनतारी दळणवळण, त्यात वापरण्यात येणारे सांकेतिक संदेश पकडून कामी लावण्यात येते. १९७१ साली झालेल्या भारत-पाक युद्धात भारताच्या सांकेतिक लिपीतज्ज्ञांनी पाकिस्तानच्या सांकेतिक लिपीची माहिती बिनचूक मिळविली. त्यामुळे भारतीय लष्कराला आपले डावपेच आखण्याला खूपच मदत झाली. ढाक्याच्या परिसरात पाकिस्तानच्या लष्कराची कोंडी झाली होती त्या वेळी तेथील पाकिस्तानी सेनापती जन. निआझी आणि त्यावेळचा पाकिस्तानचा अध्यक्ष याह्याखान ह्यांच्यांत बिनतारी संदेशांची देवाणघेवाण चालली होती. भारतीय लष्करप्रमुखांना ह्या दळणवळणाची माहिती मिळत असे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जर्मनीच्या गुप्तहेर संघटनेतर्फे जे संदेश पाठविण्यात येत त्यांपैकी बरेच ब्रिटनच्या सांकेतिक लिपीतज्ज्ञांनी पकडले व महत्त्वाची माहिती मिळविली. महायुद्धात जपानने पर्ल हार्बरवर अचानक हल्ला करून अमेरिकेच्या आरमाराची जबरदस्त हानी केली. पण हा हल्ला तसा अचानक म्हणता येणार नाही. कारण, अमेरिकेच्या सांकेतिक लिपीतज्ज्ञांनी जपानच्या संदेशांचा अर्थ लावून हल्ला होण्याचा संभव स्पष्टपणे वर्तविला होता. परंतु काय असेल ते असो, अमेरिकेच्या संरक्षणखात्याने सदर इशाऱ्याची दखलच घेतली नाही.

## परदेशी प्रवासी भारतात कशासाठी येतात ?

परदेशी हौशी प्रवासी भारतात आल्यामुळे देशाला परदेशी चलनाची प्राप्ती होते. उत्पन्नाची एक बाब म्हणून इतर देशां-प्रमाणे भारतही त्यांच्या सुखसोयींकडे प्रवासी खात्यातर्फे लक्ष पुरवितो. पण, प्रवाशांच्या दृष्टीने भारत कसा दिसतो आणि ते येथे का येतात, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. परदेशी प्रवाशांच्या मुलाखती घेऊन त्यांना कोणत्या गोष्टी आकर्षित करतात ते एका पाहणीच्या द्वारे अजमावण्यात आले आहे. त्यावरून असे दिसून आले आहे की प्रवाशांना आकर्षित करणारी अनेक कारणे असली तरी त्यात दोन विशेष प्रधान आहेत. १९७२ साली सुमारे पावणेचार हजार परदेशी प्रवाशांना त्यांच्या आग-मनाच्या कारणाविषयी प्रश्न विचारण्यात आले. प्रश्नांना उत्तरे देताना निम्म्या प्रवाशांनी भारतामधील चांगली हवा आणि नैसर्गिक सौंदर्य ह्यांनी आपण आकृष्ट झाल्याचे सांगितले. काही प्रवाशांनी देशातील सुंदर इमारती, देवळे आणि चर्चे पाहाण्या-साठी आल्याचे सांगितले. काही प्रवाशांनी येथील अतिथ्यशील व स्नेहपूर्ण लोकांनी आपणास येथे आणले असल्याचे सांगितले. त्याशिवाय कित्येकांनी येथील बाजारपेठा, त्यांतील योग्य किंमती, चांगले अन्न आणि राहाण्याची सुखपूर्ण व्यवस्था ह्याबद्दल पसंती दर्शविली.

### जगभर अन्नाच्या किमती भडकत चालल्या

जगातील सर्वच देशात अन्नाच्या किमती भयावह रीतीने भडकत चालल्या आहेत. पूर्वेकडील सिंगापूरपासून ते उत्तर अमेरिकेतील सर्वच दुकानदार चढत्या किमती मुकाट्याने पाहात बसले आहेत. इटालीत पाव मिळविण्यापायी दंग्यांनी उसळी घेतली आहे. तेथे मद्याच्या किमती एकाच वर्षात ३२ टक्क्यांनी वाढल्या आहेत. फ्रान्समध्ये मांसाच्या किमती १० टक्क्यांनी वाढल्या असून फळे आणि भाजीपाल्याच्या किमती गेल्या उन्हाळ्यापेक्षा १८ टक्क्यांनी चढल्या आहेत. अमेरिका हा देश धनधान्यसमृद्ध नेहमीच असतो. पण तेथेही अन्नपदार्थांच्या किमती १३·७ टक्क्यांनी वाढल्या. अमेरिकेत ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या ९ दिवसांतच किमती ४·५ टक्क्यांनी वाढल्या. रशिआ, भारत व चीन ह्या देशांत गेल्या दोनतीन वर्षांत पिके मोठ्या प्रमाणावर बुडाली. त्या देशांनी धान्याच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खरेदी केली, त्याचाही परिणाम किमतीवर झाला.

---

### रोमन लोकांच्या विलासी जीवनाची माहिती

रोमन साम्राज्याचा नाश होण्यास जी अनेक कारणे सांगितली जातात, त्यात त्यांच्या स्त्रीविषयक विलासी जीवनाला इतिहासकारांनी मोठे महत्त्व दिले आहे. तथापि त्यांच्या ह्या जीवनाची फारशी माहिती आजपर्यंत जगाला नव्हती. कारण, ह्याविषयीचे प्राचीन ग्रंथ व शिल्पादी साधने वस्तुसंग्रहालयाच्या तळघरात मोठ्या बंदोबस्तात ठेवण्यात आलेली आहेत. आतापर्यंत ह्या साधनांचा उपयोग फक्त कलाकारांनाच करू देण्यात येत असे. परंतु ह्या वर्षी ही सर्व साधने सरळ वस्तुसंग्रहालयात उघड्यावर ठेवण्यात येणार आहेत. नेपल्समधील वस्तुसंग्रहालय ह्या बाबतीत पुढाकार घेणार आहे. गेल्या काही वर्षांत स्त्री-प्रेमविषयक दृष्टिकोनात अभूतपूर्व बदल झाला असताना रोमन लोकांचे एतद्‌विषयक जीवन बंदिस्त ठेवण्यात अर्थ राहिलेला नाही. मात्र त्याचे दर्शन वयात आलेल्यांनाच घडू शकेल.

---

### मद्याची निर्यात वाढली, आयात घटली

गेल्या काही वर्षांत भारतातून निर्यात होणाऱ्या मद्यात वाढ झाली असून आयातीत मात्र बरीच घट झाली आहे. १९७१-७२ साली भारतामधून १ लाख, ६९ हजार रुपये किमतीचे मद्य निर्यात करण्यात आले होते. १९७२–७३ सालच्या पहिल्या ९ महिन्यांतच १४·३ लाख रुपयांच्या मद्याची निर्यात करण्यात आली. परदेशी आयातीचे आकडे असे आहेत :– १९६९–७० ची मद्याची आयात रु. ४८ लाख, १९७०–७१ ची आयात २९ लाख, १९७१-७२ ची आयात २७ लाख. निर्यात होणाऱ्या मद्यात अधिक हिस्सा बिअर ह्या मद्य प्रकाराचा आहे. बिअरशिवाय इतर प्रकारच्या मद्याचे उत्पादनही भारतात वाढले आहे. त्यामुळे इतर प्रकारच्या दारूची निर्यातही होऊ लागली आहे.




# अनाथ व अपंग ह्यांची गरज भागवून भ. महावीरांच्या संदेशाचा प्रसार

## पांघरावयाच्या १ लक्ष चादरी वाटण्याची योजना

(सौ. कुमुदिनीबाई गोविंदजी दोशी, संपादिका, 'जैनबोधक')

पुणे जिल्ह्यातील घोडनदी येथील स्थानकवासी, वयाने सत्तरी-जवळ आलेले एक दिगंबर जैन धर्मबंधू समाजसेवक श्री. सुखलालजी खाबिया यांनी भ. महावीर २५०० व्या निर्वाण महोत्सवा-निमित्त १० लाख रुपये जैन समाजातून जमवून त्या निधीतून १ लाख पांघरावयाच्या चादरी घ्यावयाच्या, या चादरीवर भ. महावीरांचा संदेश छापावयाचा व या चादरी निधी जमविलेल्या भागातच असलेल्या अनाथ व अपंग लोकांना वाटावयाच्या अशी योजना आखली. आपली ही योजना त्यांनी अनेक आचार्य-मुनींना, मान्यवर मंडळी-नेत्यांना सांगितली, मांडली. यावर विचारविनिमय होऊन ही योजना कार्यप्रवण करण्याचे ठरले. मुंबई येथील "श्री घाटकोपर स्थानकवासी जैन स्वयंसेवक मंडळ" ने याबाबत पुढाकार घेतला असून परवाच्या भ. महावीरांच्या निर्वाणदिनापासून या मंडळाच्या कार्यकर्त्यांनी या योजनेच्या प्रत्यक्ष कार्यास सुरवातही केलेली आहे. हे कार्यकर्ते छोट्यामोठ्या गावागावांत जातात. त्यांना आपली योजना सांगतात व मिळतील तेवढ्या चादरीचे पैसे घेऊन दुसऱ्या गावी जातात. या योजनेने घराघरातून भ. महावीरांची २५ शे वी शताब्दी असल्याची माहिति होते. त्यानिमित्त घराघरांतून ज्ञान मिळते नी भ. महावीरांच्या संदेशाचा प्रचार, प्रसार होऊन अनाथ-अपंगाची गरज भागते. त्यांना समाजाची सहानुभूती लाभते व चादरीरूपाने ८–१० वर्षेतरी हा संदेश त्या घरात टिकतो. या दृष्टीने श्री. सुखलालजींच्या कल्पकतेचे मला कौतुक वाटले. श्री. सुखलालजींनी फार मोठा संकल्प सोडला आहे. समाजाच्या दातृत्वावर या योजनेची भिस्त असल्यामुळे ही पूर्णपणे यशस्वी होईल का, अशी मनात शंका येते. ती पूर्णपणे यशस्वी होवो अथवा न होवो, जेवढ्या प्रमाणात ती यशस्वी होईल तेवढ्या प्रमाणात ती आपले संदेश-प्रचाराचे काम करणार आहे हे मात्र निश्चित. मला या योजनेप्रमाणेच ही योजना कार्यान्वित करणाऱ्या कार्यकर्त्यांचे व त्यांच्या परिश्रमांचेही कौतुक वाटते आणि या कार्यासाठी ती मंडळी छोट्यामोठ्या गावांतून-शहरांतून जात आहेत, त्यांनी कार्यासाठी हे जे क्षेत्र निवडले त्याचे पण कौतुक वाटते.

'जैनबोधक' २०–८–७३

## व्यापारी बँकांची गेल्या २१ वर्षांतील प्रगती

| | डिसेंबर १९५१ | डिसेंबर १९६८ | जून १९६९ | जून १९७० | जून १९७१ | डिसेंबर १९७१ | जून १९७२ | डिसेंबर १९७२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. व्यापारी बँकांची संख्या | ५६६ | ८६ | ८९ | ८५ | ८० | ८३ | ८३ | ८३ |
| (अ) शेड्यूल्ड | ९२ | ७० | ७३ | ७२ | ७३ | ७४ | ७४ | ७४ |
| (ब) बिगरशेड्यूल्ड | ४७४* | १६ | १६ | १३ | ७ | ९ | ९ | ९ |
| २. भारतातील कचेऱ्या | ४,१५१ | ७,६४८ | ८,२६२ | १०,१३१ | १२,०१३ | १३,९८५ | १३,६२० | १४,७३९ |
| ३. किती हजार लोकसंख्येस एक कचेरी | ८७ ह. | ६९ ह. | ६५ ह. | ५४ ह. | ४६ ह. | ४३ ह. | ४२ ह. | ३७ ह. |
| ४. शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी (कोटी रु.) | ९०८·४७ | ४,४७७·९५ | ४,६४६ | ५,२७५ | ६,२१६ | ६,९३८ | ७,५९६ | ८,१४६ |
| ५. दिलेली कर्जे (कोटी रु.) | ६२६·९० | ३,१५८·६७ | ३,५९९ | ४,२१३ | ४,७६३ | ५,०५२ | ५,४६६ | ५,३९८ |
| ६. प्रत्येक कचेरीकडील सरासरी ठेवी (लक्ष रु.) | २२ | ५९ | ५८ | ५३ | ५२ | ५४ | ५६ | ५६ |
| ७. दरमाणशी ठेवी (रु.) | २५ | ८५ | ८८ | ९८ | ११३ | १२५ | १३५ | १४३ |
| ८. दरमाणशी कर्जे (रु.) | १७ | ६० | ६८ | ७८ | ८७ | ९१ | ९७ | ९५ |
| ९. चालू किमतीने राष्ट्रीय उत्पन्नाशी ठेवींचे प्रमाण (%) | ९ | १६ | १५·३ | १५·९ | १७·२ | १९·६ | १९·६ | १९·९ |
| १०. ठेवींशी कर्जाचे प्रमाण (%) | ६९·२ | ७१ | ७७·५ | ७९·९ | ७६·६ | ७२·८ | ७०·८ | ६६·३ |

*रिझर्व्ह बँकेने कमकुवत बँकांचे सुव्यवस्थित बँकांत सक्तीने विलीनीकरण केल्यामुळे अशा बँकांची संख्या झपाट्याने कमी झाली.

# मोठ्या शहरातील व इतर ठिकाणचे बँकांतील शिपाई

**( म. ज. राजमाचीकर, बी. कॉम., मुंबई )**

" अर्थ " पाक्षिकाच्या दि. १८-७-७३ च्या अंकातील व्यवस्थापकीय समस्या ( ११ ) या शीर्षकाखाली प्रसिद्ध करण्यात आलेला श्री. सावरे यांनी लिहिलेला " बँकेचा शिपाई आणि साहेबाच्या घरचे काम " हा लेख व आर. डी. कुलकर्णी, अ. द. कुलकर्णी व मुक्तीकर यांनी त्यावर मांडलेले विचार ता. १-८-७३ च्या अंकात वाचले. हा ज्वलंत प्रश्न आहे. त्याबद्दल लेखकांचे अभिनंदन.

शिपायाकडून ऑफिसचे काम करवून घ्यावे हे म्हणणे बरोबर आहे. पण माझ्या मते शिपायाचे काम काय, हे प्रथम ठरविण्याची वेळ आली आहे. काही मोठ्या शाखांतून शिपाई बंधूंची लेजर या टेबलावरून त्या टेबलावर नेणे, ऑफिसरने मागितल्यावर ते देणे, दुपारी सबसिडियरी पोस्टिंगकरता टेबलावर काढून ठेवणे, वेळेप्रसंगी फाऊंटनपेनमध्ये शाई नसल्यास ती भरून देणे, टायपिंगकरता टाईपिस्टकडे कागद देणे किंवा टाईप झालेले आणणे, ही कामेसुद्धा अलीकडे न करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. कॅशची छोटी बॉक्स मोठ्या सेफमधून काढून दिल्यावर, कॅश केबीनमध्ये नेणे, हे सुद्धा ऑफीसचे काम असून, ते काम माझे नाही हे म्हणण्यापर्यंत त्यांची तयारी झाली आहे, असो. तेव्हा ही कामे त्यांची आहेत का नाहीत ?

माझ्या मते चांगल्या मनाची माणसे कधीही शिपायांना " अरे-तुरे " म्हणून हाक मारत नाहीत. तर " अहो-जाहो " असे म्हणूनच त्यांना पुकारले जाते. " लेजर रिकामे असले तर आणता का ? " असे विचारले जाते. काही चांगले शिपाई योग्यपणे वागतात. परंतु काही मात्र..........

एका लेखकाने असे लिहिले आहे की, बँकेच्या शिपायाचे म्हणून काम असेल तेच त्याने निमूटपणे व चोख करावे. त्याबद्दल खालीलप्रमाणे अनुभव येत आहे. बँकेत किंवा सेक्शनमध्ये सांगितलेल्या स्टूलावर ते बसत नाहीत. घंटा ऐकली तरी येत नाहीत. लेजर आणावयास सांगितले तर " मी माडीवर जात आहे, खाली जात नाही " म्हणून सरळ सांगून निघून जातात व " वर माडीवर जाणार असल्यास हे कागद घेऊन जा ", म्हटले, तर " मी वर जात नाही, खाली जात आहे ", असे उत्तर मिळते. पुष्कळ वेळा दुपारी, ऑफिसच्या वेळात, खुशाल ज्युनिअर किंवा सिनीयर ऑफिसरच्या समोर खुर्चीवर बसून गप्पा मारल्या जातात. हे योग्य आहे का ? एखादा ज्युनिअर किंवा सिनीयर साहेब जर जे. जी. एम. किंवा कस्टोडियन साहेबांकडे गेला व त्याला बसण्यास सांगितले नसताना, तो जर बसला, तर ते योग्य दिसेल का ? काही शिपाई तर ऑफिसच्या वेळात खुशाल तंबाखू खात बसलेले असतात. कधीकधी ऑफिसच्या व्हरांड्यात त्यांनी सिगारेट-विडी ओढल्याचे पण पाहण्यात येते. या योग्य गोष्टी आहेत असे वाटत नाही.

याउलट, मोठ्या शहरातले सोडून बाकीचे शिपाई आदबीने, प्रेमाने वागतात. अधिकाऱ्यांकडून नेहमी योग्यतेने वागवले जाते, त्यामुळे काही वेळा ते पण समजुतीने वागतात. एस. टी. चे तिकिट काढून आणून देणे हे काम काही कमी प्रतीचे व हलके समजणे चूक आहे. आपणही आपल्या पाहुण्यासाठी एवढी कामे करतो. पुष्कळ ठिकाणी तेथे राहात असलेले स्थानिक रहिवासी ओळखीचे असतात, माहिती असते व त्यामुळे काम लवकर होते. कार्डे, पाकिटे आणा किंवा टाका, एखाद्या वेळेस काही ठिकाणी लॅान्ड्रीतून कपडे आणा म्हणणे चूक आहे असे वाटत नाही. या साध्या गोष्टी करण्यास शिपायांची काही हरकत असू नये.

घरची वेडीवाकडी कामे कोणी सांगू नयेत. परंतु थोडक्यात म्हणजे जर दोघांची रिलेशन्स चांगली असतील तर घरातील कामे करण्यास हरकत नाही. मुलांना शाळेत पोचवणे, कपडे आणणे, चहा घरातून बाहेरील खोलीत आणणे, वगैरे कामे कमी दर्जाची नाहीत, हे निश्चित आहे.

---

## काटकसरीचा नोकऱ्यांवर परिणाम

भारतामधील बेकारांना वाईट दिवसांना तोंड द्यावे लागणार असे दिसते. चालू वर्षात ५ लाख बेकारांना रोजगार पुरविण्याची मोठी योजना मध्यवर्ती सरकारने आखली होती. परंतु देशातील भडकत्या किमती लक्षात घेऊन सरकारने आपल्या खर्चात काटकसर करण्याचा निर्णय घेतला आहे. ह्या काटकसरीचा परिणाम रोजगार पुरविण्याच्या योजनेवर होण्याचा चांगलाच संभव आहे. राज्यांना खास मदत देण्याच्या योजनाही हाती घेण्यात आल्या होत्या. ह्या योजनांवरही काटकसरीची कुऱ्हाड चालविली जाण्याची शक्यता आहे. म्हणजे, भडकलेल्या किमती आणि बेकारी ह्यांचा एकच डोंब उसळणार असे दिसते.

---

## आयात कापडाचा चोरटा बाजार

मुंबईमधील मुळजी जेठा आणि मंगळदास ह्या घाऊक कापड मार्केटांशेजारी ' फॉरेन ' कापडाचा बाजारच निर्माण झाला आहे. तेथे जपान, जर्मनी, इंग्लंड, हॉंगकॉंग व चीन येथून चोरट्या मार्गे आलेले कापड उघडपणे विकले जाते. तेथील मसाल्याच्या पदार्थांच्या व्यापाऱ्यांनी स्वतःचा धंदा बंद करून सहा चौरस फुटी छोटी दुकाने अशा व्यापारासाठी उघडली आहे. त्याचे दरमहा भाडे ९०० रु. असते. दुकानाबाहेर हा चोरीचा माल टांगून गिऱ्हाइके आकर्षिली जातात; दुकानांच्या ' खऱ्या ' मालकांनी अधिकाऱ्यांचा ' बंदोबस्त ' केलेला असतो.

---

# स्वातंत्र्यसैनिकांसाठी शासनाच्या मदत योजना

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात ज्यांनी पराकाष्ठेचा स्वार्थत्याग केला व अपरंपार कष्ट सोसले अशा स्वातंत्र्यसैनिकांचे अपार ऋण आपणा सर्वांवर असून ते कधीच फिटण्यासारखे नाही. तथापि त्यांनी केलेला त्याग व सेवा यासंबंधी आदर व्यक्त करण्यासाठी व त्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाकडून सन्मान-पत्रे, आर्थिक अनुदाने, नोकरीविषयक सवलती, जमीनविषयक सवलती, शैक्षणिक सवलती, वैद्यकीय व इतर सवलती व केंद्र शासनाकडून निवृत्तिवेतन व ताम्र-पत्रे दिली जात आहेत.

याप्रमाणे महाराष्ट्रातील ८,४४० स्वातंत्र्यसैनिकांना राज्य शासनाकडून सन्मान-पत्रे देण्यात आली असून, एकरकमी आर्थिक साहाय्य म्हणून ११,४५० स्वातंत्र्यसैनिकांना राज्य सरकारने विविध रकमा दिल्या आहेत. तसेच २,३०७ स्वातंत्र्यसैनिकांना ५० रुपयांप्रमाणे मासिक निवृत्तिवेतन मंजूर करण्यात आले आहे.

१९६५ पूर्वी शासनातर्फे स्वातंत्र्यसैनिकांना बहुधा एकरकमी अनुदान देण्यात येत होते. काही प्रकरणात ठराविक मुदतीसाठी मासिक वेतनाच्या स्वरूपातही आर्थिक अनुदान देण्यात येत होते. १९–११–१९६५ च्या शासन निर्णयानुसार गरजू स्वातंत्र्यसैनिकांना दरमहा ५० रुपयांप्रमाणे आजन्म मासिक वित्तीय साहाय्य देण्याचे ठरले. शासकीय सेवेत तृतीय व चतुर्थ श्रेणीत भरती करताना स्वातंत्र्यसैनिकांकडून आलेले अर्ज विचारात घेतले जातात. त्यांच्या भरतीच्या बाबतीत अनेक अटी शिथिल केल्या आहेत. स्वातंत्र्यसैनिकांना महसूल व वनविभागातर्फे शेतीकरिता, घर बांधण्याकरिता किंवा उद्योगधंद्याकरिता सरकारी जमिनी दिल्या जातात.

स्वातंत्र्यसैनिक, त्याची पत्नी, मुले व नातवंडे यांना प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी सवलती दिल्या जातात. सवलतींमध्ये शिष्यवृत्त्या, पुस्तकासाठी अनुदान, फी माफी, सरकारी वसतिगृहात विनामूल्य प्रवेश, मान्यताप्राप्त शाळांतून प्रवेश, यांचा समावेश होतो. मासिक उत्पन्न रु. ३०० पेक्षा कमी असणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकानांच ह्या सवलती दिल्या जातात. गृहनिर्माण मंडळाने बांधलेल्या घरांच्या वाटपामध्ये स्वातंत्र्यसैनिकांकरिता अडीच टक्के गाळे राखून ठेवले जातात. रु. ३०० पेक्षा कमी मासिक उत्पन्न असलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना शासकीय इस्पितळामध्ये मोफत वैद्यकीय तपासणीची व मोफत औषधोपचाराची सोय केली जाते. स्वातंत्र्यसैनिकांना, भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांना व दिवंगत स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सन्मान-पत्रे देण्यात येतात.

### केंद्र शासनाची योजना

ऑगस्ट १५, १९७२ म्हणजे स्वातंत्र्याच्या २५ व्या वर्धापनदिनापासून केंद्र शासनाने स्वातंत्र्यसैनिकांसाठी आपली योजना अमलात आणली. या योजनेनुसार स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या स्वातंत्र्यसैनिकांनी कमीत कमी सहा महिने कारावास भोगला त्यांना, तसेच जे स्वातंत्र्यसैनिक हयात नाहीत अशांच्या गरजू कुटुंबीयांना निवृत्तिवेतन देण्यात येते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जीवन बलिदान करून जे हुतात्मा बनले आहेत अशा स्वातंत्र्यसैनिकांची कुटुंबेदेखील निवृत्तिवेतनासाठी पात्र आहेत. स्वातंत्र्यसैनिकांची आर्थिक परिस्थिती तसेच राज्य सरकारकडून काही आर्थिक मदत मिळत असल्यास ती लक्षात घेऊन केंद्रशासन स्वातंत्र्यसैनिकांचे निवृत्तिवेतन ठरविते. हे मासिक निवृत्तिवेतन स्वातंत्र्यसैनिकांच्या बाबतीत रु. २०० व त्यांच्या कुटुंबाच्या बाबतीत १०० ते २०० रुपये इतके दिले जाते.

ज्यांनी सहा महिने कारावास भोगला आहे अशा सर्व स्वातंत्र्यसैनिकांना, मग ते निवृत्तिवेतनास पात्र असोत किंवा नसोत, केंद्र शासनाची ताम्र-पत्रे दिली जातात. ऑगस्ट १५, १९७३ रोजी भारताच्या राजधानीत पंतप्रधानांच्या हस्ते राज्यातील ९२ स्वातंत्र्यसैनिकांना ताम्र-पत्रे देण्यात आली. त्याच दिवशी मुंबईमध्ये राज्यातील २५० स्वातंत्र्यसैनिकांना मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्या हस्ते ताम्र-पत्रे देण्यात आली.

राज्यातील जिल्ह्या-जिल्ह्याच्या ठिकाणी ताम्र-पत्रे देण्याचा कार्यक्रम २५ व्या वर्धापन वर्षाच्या काळात अयोजित करण्यात येऊन त्या त्या जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिकांना भारत सरकारची ताम्र-पत्रे देण्यात आली आहेत.

---

### अमेरिकेतील राहणीचा दर्जा अत्युच्च

अमेरिकेच्या डॉलरचे अवमूल्यन झाले, तेथील महागाई वाढत आहे, तरी अमेरिकन नागरिक इतर कोणत्याही देशाच्या नागरिकापेक्षा सुस्थितीत आहे. मोटारी, टेलिव्हिजन, टेलिफोन ह्यांच्या मालकीच्या बाबतीत तोच अग्रेसर आहे. दर हजारी डॉक्टरांची संख्या ऑस्ट्रिया व इटली वगळता, अमेरिकेतच जास्त आहे. दर माणशी उत्पन्न अमेरिकेत सर्वात जास्त म्हणजे ३,२३० डॉलर्स आहे; कॅनडात ते २,४५० डॉलर्स, प. जर्मनीत १,९१० डॉलर्स, फ्रान्समध्ये १,८७० डॉलर्स आणि जपानमध्ये १,२३० डॉलर्स आहे. (हे आकडे १९७१ चे आहेत)

अमेरिकेत प्रत्येक १,००० नागरिकांगणिक ५८७ टेलिफोन्स आहेत; कॅनडात ४५२, ग्रेटब्रिटनमध्ये २६७ आणि जपानमध्ये २५१ आहेत. अमेरिकेत प्रत्येक १,००० नागरिकांगणिक ४३२ मोटारी आहेत. कॅनडात ३१२, फ्रान्समध्ये २४५, ग्रेटब्रिटनमध्ये २१३ आणि जपानमध्ये ८५ आहेत.

अमेरिकेत प्रत्येक १,००० नागरिकांगणिक ४१२ टेलिव्हिजन सेट्स् आहेत. स्वीडनमध्ये ३१२, कॅनडात २९४, ग्रेटब्रिटनमध्ये २९३, व जपानमध्ये २१५ आहेत.

---


Swastik FOAM

cosy
sitting
pleasure!



SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
PUNE-411003

IMPORT
SUBSTITUTE
GADRE KEYS



ALL TYPES AS
PER SPECIFICATION

GADRE BROTHERS MADHAVNAGAR (MAHARASHTRA)
PHONE NO. 2318 GRAM: "SEWA"

" नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. "

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळींची प्रेरक शक्ती*

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.**

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

| | | |
|---|---|---|
| तारेचा पत्ता : "मॉर्गेज" | दूरध्वनी | मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स) |
| | | कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन) |
| | | उपकार्यालय नं. १:-२६०३०६, नं. २: २९०००६ |

राज्य सहकारी भूविकास बँक व राज्यातील तिच्या २५ जिल्हा शाखा यांच्यामार्फत तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच ट्रॅक्टर व जमीन-सुधारणेकरिता कर्ज-वाटप करण्यात येते. जून १९७२ अखेर बँकेचे भागभांडवल ९ कोटी ३० लाख, गंगाजळी ८३ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ५७ कोटी व येणे कर्ज १२१·२२ कोटी आहे.

डी. एस. जोशी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

# आले, आले, चिकित्सक आले !

लेखक : विजय गोखले

एका कंपनीची अधिकारी मंडळी सहलीला गेली होती. थंडीचे दिवस होते. शेकोट्या पेटवण्यासाठी लागणारी लाकडे जमवली, पालापाचोळाहि गोळा केला आणि दिली एक काडी लावून–झोंबणारी थंडी, वाजणारे दांत व निबर अंधाराचा पडदा जरा बाजूला झाला. अन् प्रत्येकजण आपापले नगारे शेकू लागला. त्या वेळी एकाने किस्सा सुनावला :–

"एक राजा होता. राजा आला की संस्थान आले, प्रजा आली, राणी आली, हत्ती, अंबारी, घोडागाडी, राजवाडा वगैरे सर्व गोष्टी ह्या ओघाने आल्याच. शिवाय प्रधानमंडळ असायलाच पाहिजे. सल्लागार मंडळांत मामासाहेबही येणारच, खुषमस्करे आहेतच—असे हे सर्व आहे – धरूनच गोष्टीला प्रारंभ करतो. राजाचे राज्य चालू (?) होते. राज्यांत सर्वत्र आबादीआबाद होती. राजाचा लौकिक मोठा होता, त्यामुळे पाहुणे मंडळींची वर्दळहि बरीच होती. इन् फॅक्ट त्यामुळेच राजाला राज्य चालवण्यास फारसा वेळ मिळत नसे. अर्थात् राजाला थोडाच राज्यकारभार बघावयाचा असतो. प्रधानमंडळ ते कशासाठी ?

"राज्याची मिळकतहि चांगली होती अन् खर्चालाही भरपूर वाटा होत्या, म्हणजेच सढळ हाताने कारभार चालू होता. (आयजीच्या जीवावर बायजी ...). राज्याचा विस्तारही वाढत होता (प्रजा हो !) आणि राजाचे सरदार लोकही वाढत होते. प्रत्येकाला राजाने निरनिराळी गावे इनाम म्हणून दिली होती, आणि ते सरदारही आपापल्या इनामगावी खुशीत होते व राजाला खजिना भरावयाला (की रिकामा करावयाला) मदत करत होते.

"पुढे एकदा राजाच्या स्वप्नांत आले की आपले राज्य (अशा कारभारापायी) खालसा होणार ! अन् त्याचा धसका जो राजाने घेतला तो त्यातच आजारी झाला. राजा काही खाईना, पिईना. राजाचे कशातच लक्ष लागेना, राजा कृश व्हावयास लागला व अंथरुणाला खिळला. बरे, राजपुत्रांना राज्यावर आणावे तर ते लहानच होते, मोठी पंचाईत आली. तेव्हा राजाच्या नात्यातील तरुणाला तात्पुरते सर्वाधिकार देऊन राज्याची देखभाल प्रधानमंडळाच्या सल्ल्याने बघण्यास सांगितले, आणि राज्यातील धन्वंतऱ्यांना बोलावले, पण काही उपाय चालेना अन् कोणाला राजा कशामुळे आजारी झाला हेही कळेना. हा–हा म्हणता ही बातमी शेजारच्या राज्यात पसरली, अन् मग त्यातील एका राजाने आपल्या राज्यातील खास चिकित्सकांचे (Consultants) पथक पाठवले. अर्थात् ही बातमी कोणालाच माहिती नसावी.

शाही पाहुणे येणार ! शाही पाहुणे येणार !!

शाही पाहुण्यांना आणण्यासाठी गणपतराव हे खास राजदूत विमानतळावर पाठवण्यात आले होते अन् त्यांचे भव्य स्वागत करून त्यांना राजवाड्यावर आणले होते. राज्यातील सारी सरकारदरबारी मंडळी, सरदारलोक, प्रधानमंडळ हे आपल्या ठेवणीतील दरबारी पोषाखासह हजर होते. ह्या दरबार मंडळींशी ओळखीचा वगैरे कार्यक्रम होऊन खान्यानंतर पाहुणेमंडळी खास विश्रांतिगृहात परतली होती. राजेसाहेबांचा खास हुजऱ्या भाऊराव त्यांच्या दिमतीला दिला होता.

... इकडे संस्थानचे अमात्य – सत्यव्रतराव हिशोबनीस बरेच बेचैन झाले होते. हे शाही पाहुणे कोण व कशासाठी आले आहेत ? मुलाखतीत तर त्यांनी 'राज्याचा सारा काय ? सरदार लोक किती ? खर्चाचे अंदाजपत्रक काय ?' वगैरे प्रश्न विचारले, म्हणजे काय ? – आम्ही मोबदला देऊ शकणार नाही अशी त्यांची समजूत आहे की काय ? – अन् त्यातून मामासाहेब गायब – काय प्रकार आहे हा ?

स्वयंभू सेनापती – रामराव तर मुठी आवळून – कोणत्या भाषेत बोलावे ह्याच संभ्रमात होते – अहो ! हे राजाला तंदुरुस्त करावयास आले का आमचे सैन्य किती ? का – त्यावर खर्च किती ? – का–शस्त्रागारावर खर्च काय ? अन् तो राज्यकारभारासाठी आणलेला का – आलेला – नवतरुण तर त्या शाही पाहुण्यांना आकड्याची महिती सांगत होता – ही काय फंदफितुरी आहे ? आम्ही तलवारीशी तलवार लावणारे – संगिनीशी संगिनी भिडवणारे – आम्हाला – आम्हाला ह्यातलं काय कळणार ! कमाल आहे झालं !!

कोठीत माल किती ? मालाचे वाटप कसे होते ? – हे काय प्रश्न झाले ? मी नारायणराव कोठीवाले जिवंत असेपर्यंत ह्या उपऱ्यांना येथे बिलकुल थारा देणार नाही. म्हणे मुलाखती स्वतंत्र घेण्यात येतील – त्या कशापायी ? अहो ! कोठीत आली ती आवक आणि बाहेर गेली ती जावक – राजेसाहेबसुद्धा आम्हांला असले प्रश्न विचारत नाहीत, त्यांना आम्ही जन्मापासून पाहातो आहे. बालपणापासून तर आम्ही एकत्रच वाढलेलो ! – काय हेच का आमच्या सेवेचे फळ !

कधीहि न संतापणारे राजवैद्य – आनंदराव ढोले तर ह्या मुलाखतीनंतर ज्वालामुखीसारखे तप्त झाले होते. ह्यांना जरी धन्वंतरी विद्या येत नव्हती तरी हातचलाखीवर ते वेळ मारून नेत असत अन् त्यामुळेच राजमर्जीतील खास ! ह्यांची ख्याती अशी की रोगी जगला तर ह्यांच्याच औषधाने – पण चुकून मेला (हेच नेहमी व्हावयाचे) तर त्याच्या कर्माने ! अर्थात् लोकांची नाडी –(अप्रत्यक्ष ह्यांच्याच हातात) परीक्षा करण्यांत तरबेज असल्यामुळे वैद्यकीय कामाबरोबरच त्यांना राज्यातील हेरगिरीचे काम (चोराची पावले चोरालाच ओळखणार – ह्या तत्त्वावर) सोपवले होते. परंतु नव्या पाहुण्यांच्यामुळे त्यांच्यावर गदाच आली होती, अर्थात् एका बाजूने बातमीवर बातमी काढून ते राज्यात प्रसृत करत होतेच, अन् ती राजाच्या कानापर्यंत जाईल हेही पाहाण्यास विसरत नव्हते – पण छे ! हे अरिष्टच !! ...

वरील स्वगते चालू होती तरी सुद्धा राजाज्ञेपुढे मान तुकवणे हे सर्वांचे आद्य कर्तव्यच नाही का? आणि म्हणूनच ही मंडळी इमानेइतबारे ह्या चिकित्सकांच्या कामात मोठ्या उत्साहाने मदत करत होती. राज्यातील सर्व भागांतून हे शाही पाहुणे जाऊन प्रत्येक सरदाराकडून काहीतरी माहिती गोळा करून आणीत होते. म्हणता म्हणता माहितीचा हा ढीग झाला, कागदाची उंची तर मोजता न येण्यासारखी झाली भाऊरावाला तर ती नीट व व्यवस्थित लावून देण्यापुढे फुरसतच मिळत नव्हती. एक मात्र निश्चित ती माहिती वाचून, नीट लावल्यामुळे व शिवाय चिकित्सकांच्या दिमतीला राहिल्यामुळे भाऊरावाला ती माहिती इतकी मुखोद्गत झाली होती की ते भर दरबारात पोपटपंची केल्याप्रमाणे सर्वांना ऐकवत होते.

—असो. शेवटी त्यांनी ती माहिती पेटाऱ्यात भरून ठेवली अर्थात् हे सर्व कशासाठी ह्याची जिज्ञासा तशीच राहिली, कारण एक दिवस ते बांधलेले पेटाऱ्यासुद्धा शाही पाहुणे पसार झाले. पुढे काय?—

मित्र हो! आपण सर्व सुज्ञ आहात, कालचाच गोंधळ आजच्यापेक्षा बरा म्हणण्याची पाळी येऊं नये ही इच्छा! राहून राहून वाटते की खर्चाला आणखी एक तोंड फुटले...... पण कुणाच्या खिशातून थोडेच खर्च होणार आहेत! तेव्हा तापलेल्या भट्टीत सारा दोन लाकडे, तेवढीच थंडी कमी भासेल......

---

## बाटा कंपनीच्या शेअर्सना प्रचंड मागणी

बाटा इंडिया लिमिटेडने प्रत्येकी १० रुपयाचे ६,००,००० शेअर्स प्रत्येकी २० रु. वाढाव्याने (म्हणजे प्रत्येक १० रु. च्या शेअरला ३० रु. ह्या दराने) विक्रीस काढले होते. कंपनीकडे १,०७,४८,४९० शेअर्सची मागणी करणारे ८१,११४ अर्ज आले, म्हणजे विक्रीस काढलेल्या शेअर्सच्या १८ पट शेअर्ससाठी मागणी आली.

---

**वीजकपातीमुळे ६५ कोटी रु. चे उत्पादन कमी झाले—** महाराष्ट्रातील गेल्या सहा महिन्यातील वीजकपातीमुळे सुमारे ६५ कोटी रु. चे उत्पादन कमी झाले.

**औद्यौगिक उत्पादनात सुधारणा नाही—** १९७३ सालातील औद्योगिक उत्पादनाचे चिन्ह फारसे आशादायक नाही. १९७१ च्या मानाने १९७२ साली उत्पादन ७·१% अधिक झाले होते. पण चालू वर्षीचे उत्पादन फारसे वाढणार नाही.

**निर्गतीचा उच्चांक—**१९७२–७३ मध्ये भारताने १,९६२ कोटी रु. किमतीच्या मालाची निर्गत केली. १९७१–७२ मधील निर्गतीपेक्षा ही निर्गत २२% ने अधिक आहे. कातडी, कपास-कापड, तयार कपडे, इंजिनिअरिंग कारखान्यांचे उत्पादन, ह्यांच्या निर्गतीत विशेष वाढ झाली.

## हिंदच्या अर्थव्यवस्थेविषयी ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञांची चिकित्सा

हिंदच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीबद्दल ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञांची मते लंडनमधील वृत्तपत्रांतून आणि ब्रिटिश नभोवाणीवरून व्यक्त करण्यात आली. ते म्हणतात की, पाकिस्तानशी १९७१ साली झालेल्या युद्धात जय मिळाल्यानंतर भारतात सर्वत्र उत्साहाचे वातावरण पसरले होते ते जितके कृत्रिम होते तितकीच सध्याची निराशाही अतिरंजित आहे. तथापि भारत सध्या आर्थिक संकटात सापडला आहे ह्यात शंका नाही. शेतीच्या उत्पादनात घट झाली आहे. औद्योगिक उत्पादन थबकलेले आहे. सर्वत्र टंचाई भासत आहे आणि गेल्या वर्षात किमती २५ टक्क्यांनी वाढल्या आहेत. गेल्या दोन वर्षांत भारताच्या शेतीच्या उत्पादनात त्यामागील काळाप्रमाणे सुधारणा झाली नाही. बांगला देशात झालेल्या युद्धानंतर सरकारी खर्चात फार वेगाने वाढ झालेली आहे. त्यामुळे उपलब्ध साधनांवरील ताण एकदम खूप वाढला. हरित क्रांतीमुळे जितका फायदा झाला असे सांगण्यात येते तितका तो झालेला नाही. ह्या क्रांतीचा फायदा घेण्याची संधी नीट साधून घेण्यात आली नाही. हरित क्रांती यशस्वी होण्यासाठी रासायनिक खते, कीडनिवारक औषधे आणि योग्य वेळी पाण्याचा पुरवठा ह्यांची आवश्यकता असते. पण ह्या बाबतीत योग्य ते प्रयत्न करण्यात आले नाहीत. शिवाय शेतीत गुंतविण्यात येणारे भांडवल पूर्वीप्रमाणेच थोडे होते. त्याच वेळी ज्या कारखान्यांपासून दीर्घ कालावधीत दृश्य फळ दिसू लागेल अशा प्रकल्पात मात्र मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक करण्यात आली. जमीनधारणेच्या व्यवस्थेत सुधारणा करण्याची वचने वेळोवेळी देण्यात आली. त्यांच्या सद्हेतुबद्दल शंका घेण्याचे मुळीच कारण नाही. परंतु सुधारणांची अमलबजावणी चांगली झाली नाही. बऱ्याच जमीनधारणेच्या सुधारणा स्थानिक हितसंबंधीयांच्या विरोधामुळे प्रत्यक्षात केल्या गेल्या नाहीत. ह्याचा परिणाम शेतीच्या उत्पादनावर झाला.

---

## जागतिक बाजारातील भारताचा वाटा कमी झाला

जागतिक बाजारातील भारताचा वाटा १९६२ मध्ये १·१३% होता, तो १९७२ मध्ये ०·६७% वर आला. विकसित देशांचा वाटा १८·६% ने वाढला, तर अविकसित देशांचा वाटा ५·१% ने वाढला. भारताच्या निर्गतीत अद्यापही चहा, तंबाखू, पेंड, काजू, खनिजे, कापड, ताग, इत्यादींचाच मुख्यतः समावेश आहे. ह्या सर्वांच्या मागणीत आणि किमतीत नेहमी चढउतार होतो. औद्योगिक उत्पादनाची निर्गत वाढविणे महत्त्वाचे झाले आहे. परंतु, देशातल्या देशातच मागणीच्या मानाने पुरवठा कमी आहे. निर्गतीची किंमत वाढत आहे, एवढ्यावर समाधान मानण्याजोगी परिस्थिती नाही.

---

### गिरण्यांची रोजची १० कोटी रु. काळ्या पैशाची कमाई

"कापसापासून स्वतःच सूत काढून कापड बनविणाऱ्या गिरण्या दररोज १० कोटी रु. ची काळ्या पैशाची कमाई करतात. देशातील ७०० 'कॉंपोझिट' गिरण्यांचे रोजचे उत्पादन ५०,००० किलोग्रॅम एवढे आहे. गिरण्यांच्या विक्रीत प्रत्येक किलोग्रॅमवर बिलात न दाखविलेले ४ ते ५ रु. घेतले जातात. म्हणजे, प्रत्येक गिरणी काळ्या पैशाची २ लक्ष रु. ची. कमाई दररोज करते." ऑल इंडिया पॉवरलूम्स फेडरेशनने वरील प्रकारची तक्रार पंतप्रधानांकडे एका लेखी निवेदनात केली आहे. नॅशनल टेक्स्टाइल्स कॉर्पोरेशन किंवा राज्यांच्या टेक्स्टाइल्स कॉर्पोरेशन्सच्या नियंत्रणाखालील गिरण्याही ह्या कमाईला अपवाद नाहीत, त्याही वाढव्याची रकम गुप्तपणे घेतात, असा फेडरेशनचा आरोप आहे.

---

### ४१ लक्ष लोकसंख्येला ५६ लक्ष माणसांचे रेशन !

दिल्लीची लोकसंख्या ४१ लक्ष आहे, पण तेथील रेशन युनिट्सची संख्या ५६ लक्ष आहे ! 'अर्ज द्या आणि रेशनकार्ड घेऊन जा' ह्या अर्जांची छाननी न करताच रेशनकार्डे देण्याच्या नव्या योजनेचा हा परिणाम आहे.

---

**सहकारी सोसायट्यांच्या निवडणुका** — महाराष्ट्र राज्यातील सहकारी सोसायट्यांच्या ज्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या, त्या ३० नोव्हेंबर पूर्वी करण्यात आल्या पाहिजेत असे महाराष्ट्र सरकारने ठरविले आहे.

### परवाने न घेणारे टेलिव्हिजनचे मालक

रेडिओ व टेलिव्हिजन सेट्स जवळ बाळगणाऱ्यांना पोस्ट खात्याकडून परवाने घ्यावे लागतात आणि ते सालोसाल चालू ठेवावे लागतात. परवाने न घेता त्यांचा वापर करणे गुन्हा आहे. तरीही शेकडो लोक असे गुन्हे करीत असतात. रेडिओचा परवाना नसताना रेडिओ वापरल्याबद्दल कधी कधी दंड झाल्याचे वृत्त येते. टेलिव्हिजनच्या बाबतीत अशीच परिस्थिती आहे. टेलिव्हिजन पडदे तयार करणाऱ्या कारखानदारांच्या माहितीप्रमाणे १९७२ च्या आक्टोबरपासून १९७३ च्या मार्चपर्यंत मुंबईत ५० हजार टेलिव्हिजन सेट्स विकण्यात आले. ह्या सर्वांना परवाने आवश्यक होते. पण पोस्टमास्तर जनरलने दिलेल्या माहितीप्रमाणे ह्या काळात फक्त १९ हजार टेलिव्हिजनचे परवाने देण्यात आले. समाजातील सधन लोक सरकारी देणे कसे चुकवितात ह्याचा हा एक अलीकडील नमुना आहे. वास्तविक टेलिव्हिजनच्या किमतीच्या मानाने परवाना फी अल्प आहे.

---

**पेट्रोलचे रेशनिंग होणार** — पेट्रोलचे रेशनिंग लवकरच केले जाईल, असे समजते. सर्व खासगी वाहनांच्या पेट्रोलमध्ये ४०% कपात केली जाईल; टॅक्सींना १६% कपात लागू होईल आणि स्कूटर्स व मोटरसायकली ह्यांना रेशनिंग लागू केले जाणार नाही असा अंदाज आहे. पेट्रोलची किंमत दर लिटरला १० पैसे ह्यापूर्वीच वाढविण्यात आली आहे.


॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणे 30

म्हणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझिया पाउलीं
या कारणे मी साउली । न संडीं तुझी ॥ — श्री ज्ञानेश्वरी

**स्वातंत्र्यदिनाच्या मंगल प्रसंगी**

**आमचे भागधारक, ठेवीदार व हितचिंतकांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा !**

शुभ्र दाणेदार साखरेचे, रेक्टिफाईड व डिनेचर्ड स्पिरीटचे व उच्च प्रतीच्या
देशी व विदेशी ( IMFL ) मद्याचे उत्पादक

**भारतीय स्वातंत्र्याचा जयजयकार असो !**

फोन : ५८०९५ – पुणे
ग्रॅम : श्री – पुणे

ज. चं. आगाशे,
ज्ञा. चं. आगाशे,
जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर्स

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, [illegible], अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में वे कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण है: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है. २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



[illegible] सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

[illegible] विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: [illegible]

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)